शासकीय प्राथमिक आरोग्य केंद्र/ शासकीय रुग्णालयात जन्मणा-या नवजात बालकांना बेबी केअर कीट उपलब्ध करुन देणे राज्यपुरस्कृत योजनेसाठी नविन लेखाशिर्ष मंजूर करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः एबावि-२०१८/प्र.क्र.३५४/का.६

नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ८ फेब्रुवारी, २०१९

वाचा :- (१) महिला व बाल विकास विभाग,शासन निर्णय :- एबावि-२०१८/प्र.क्र.१५१/का.६, दि. २९ डिसेंबर २०१८

(२) महालेखापाल,मुंबई यांचे पत्र क्र.ख.वि./चा-१/महिला तथा बाल विकास/ यू ओ आर-१८२/२०१८-१९/१०९४, दिनांक ७ फेब्रुवारी २०१९

शासन निर्णय :-

महाराष्ट्र राज्यात शासकीय प्राथमिक आरोग्य केंद्र/शासकीय रुग्णालयात गरोदरपणी नाव नोंदणी केलेल्या व त्याठिकाणी प्रसुती होण्या-या महिलांना **पहिल्या प्रसुतीच्यावेळी** त्यांच्या नवजात बालकासाठी (मुलगा किंवा मुलगी) शासनातर्फे रुपये २०००/- (रुपये दोन हजार फक्त) इतक्या रक्कमेपर्यंत बेबी केअर कीट बॅग मोफत उपलब्ध करुन देण्यास शासनाने दिनांक २९ डिसेंबर २०१८ च्या शासन निर्णयान्वये मान्यता दिलेली आहे. सदर योजना दिनांक २६ जानेवारी २०१९ पासून संपुर्ण राज्यात लागु करण्यात आलेली आहे.

२. सदर योजनेसाठी नियोजन विभाग,वित्त विभाग व महालेखापाल यांच्या मान्यतेने खालीलप्रमाणे लेखाशिर्ष मंजूर करुन घेण्यात आले असून सन २०१८-१९ पासनू सदर लेखाशिर्षाखाली निधी अर्थसंकल्पित करण्यास शासन मंजूरी देत आहे.

मागणी क्रमांक	एक्स-१
मुख्य लेखाशीर्ष उपमुख्य लेखाशीर्ष गौणशीर्ष गट शीर्ष तपशीलवार शीर्ष - योजनेचे नाव संगणक सांकेतांक क्रमांक (योजनांतर्गत / योजनेतर) (भारित / दत्तमत)	**२२३५- सामाजिक सुरक्षा व कल्याण** ०२-समाज कल्याण १०२-बाल कल्याण (१७) (१७) (०१) बेबी केअर कीट योजना (कार्यक्रम) **(२२३५C२२३)** **(योजनांतर्गत),** **(दत्तमत)** ३१-सहायक अनुदान (वेतनेतर) ५०-इतर खर्च

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०२२६१७२३०७१३३० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Lalsing
Ramchandra Gujar

Digitally signed by Lalsing Ramchandra Gujar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Women And Child Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c3eb5f6c3e4855c5793924cf2a352b44266d360de02a2494e1a64477bf79d694, serialNumber=4ca059ab7b8d64aaf749fe58e0a714a015f521cb28fd2204e49a4d81f12a5745, cn=Lalsing Ramchandra Gujar
Date: 2019.02.26 17:25:05 +05'30'

(ला.रा.गुजर)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२) मा. मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा. मंत्री / राज्यमंत्री, महिला व बाल विकास, मंत्रालय, मुंबई
४) मा.मंत्री (वित्त व नियोजन) मंत्रालय,मुंबई
५) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
६) अपर मुख्य सचिव (नियोजन विभाग) मंत्रालय,मुंबई
७) अपर मुख्य सचिव (वित्त विभाग) मंत्रालय,मुंबई
८) आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई
९) आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे
१०) संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई
११) संचालक, माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, मुंबई
१२) सर्व विभागीय आयुक्त
१३) सर्व जिल्हाधिकारी
१४) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१५) सर्व विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास विभाग
१६) सर्व महिला व बाल विकास अधिकारी, जिल्हा परिषद
१७) सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी (ग्रामीण / आदिवासी / नागरी)
१८) महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र -१, मुंबई
१९) महालेखापाल, लेखा परिक्षा, महाराष्ट्र-१, मुंबई
२०) महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र -२, नागपूर
२१) महालेखापाल, लेखा परिक्षा, महाराष्ट्र-२, नागपूर
२२) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
२३) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
२४) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
२५) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय ग्रंथालय, विधानभवन, मुंबई
२६) वित्त विभाग, (व्यय-६/अर्थसंकल्प-७)मंत्रालय, मुंबई
२७) नियोजन विभाग, (का.१४७२),मंत्रालय, मुंबई
२८) सह सचिव (श्री गुजर/श्रीमती निवतकर),महिला व बाल विकास,मंत्रालय,मुंबई
२९) महिला व बाल विकास विभागातील सर्व कार्यासने
३०) निवड नस्ती (कार्यासन ६)